मुंबई ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ नवे विचार...नवी सुरुवात ▪ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

▪ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ पुणे ▪ अहिल्यानगर ▪ वर्ष : ६ ▪ अंक : १४७ ▪ शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४




# ‘स्थानिक’ साठी मविआचा ‘मतचोरी’ तर महायुतीचा ‘धर्म’ मुद्दा ?

## आ. जयंतराव आणि आ. पडळकर यांनी दिले संकेत ; खा.विशाल पाटलांची कुरुक्षेत्रात उडी

**सांगली : विशेष प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकसाठी वातावरण निवडणूक तारीख जाहीर होण्यापूर्वीच तापले असून त्याची धग आतापासुनच जाणवू लागली आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंतराव पाटील यांनी मतचोरीचा मुद्दा उपस्थित करत भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या जत विधानसभा मतदारसंघातील विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, तर आमदार गोपीचंद पडळकर यांनी जयंतराव पाटील हे हिंदू विरोधी आहेत असा जळजळीत आरोप केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पाश्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंतराव पाटील आणि भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचे वक्तव्य म्हणजे महाविकास आघाडी ’मतचोरी’ चा मुद्दा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उचलणार असल्याचे तर ’महायुती’ धर्माचा मुद्दा तापवणार असल्याचे संकेत





या दोन्ही नेत्यांनी दिल्याचे राजकीय जाणकारांमधून व्यक्त केले जात आहे.

राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा महाराष्ट्र आणि कर्नाटक मधील मतदानासंदर्भात व्यक्त केला. बिहारमध्ये विधानसभा निवडणूक प्रचार जोरदारपणे सुरू असून येथे निवडणूक आयोगाने मयत झालेले, तसेच अन्य राज्यातील मतदार बनलेल्या मतदारांची नावे मतदार यादीतून कापली आहेत. या कापल्या गेलेल्या मतांची संख्या ७० लाखांच्या जवळपास पोहोचली आहे, त्यामुळे काँग्रेसने राष्ट्रीय पातळीवर हा मुद्दा उचलून धरून निवडणूक आयोगावर ताशेरे ओढायला प्रारंभ केला आहे. आता महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उंबरठ्यावर आल्या आहेत अशा परिस्थितीत विरोधी पक्षांनी बेरोजगारी, महागाई आदी मुद्द्यांवर आक्रमक व्हायला हवे होते, पण संविधानिक पद असलेल्या निवडणूक आयोगासंदर्भातच संशय व्यक्त करून आणि इतकाच मतचोरीवर विश्वास असेल तर प्रतिज्ञापत्र सादर करण्यास न्यायालयाने जे सांगितले , त्याकडे दुर्लक्ष करून मतचोरीचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडी तर महाराष्ट्रात महाविकास आघाडी जिवंत ठेवत असल्याबद्दल राजकीय धुरिणांमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे . जत विधानसभा मतदारसंघातील भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर अप्रत्यक्ष टीका



करताना आ.जयंतराव म्हणाले, जे गावात निवडून येत नाहीत ते अन्य मतदारसंघातून आमदार होतात अशाप्रकारे आ.पडळकर यांना डिवचले. त्याला कवठेमहांकाळ येथे एका कार्यक्रमात उत्तर देताना आ. गोपीचंद पडळकर यांनी जयंतरावांना आव्हान देत तुम्ही आमदारकीचा राजीनामा द्या, मी जतच्या आमदारकीचा राजीनामा देऊन तुमच्या इस्लामपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवतो असे लढवतो आव्हान दिले, तथापि हे बोलत असताना त्यांनी जयंतराव, तुम्ही हिंदूविरोधी आहात, असे वक्तव्य करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रचाराचे मुद्दे काय असणार हेच स्पष्ट केले असा राजकीय जाणकारांचा अंदाज असून अशात काँग्रेस विचारांचे पाईक समजणारे अपक्ष खा.विशाल पाटील यांनी देखील काँग्रेस पदाधिकार्यांच्या मेळाव्यात बोलताना मतचोरीचा मुद्दा उपस्थित करत अप्रत्यक्षपणे जयंतराव पाटलांना मतचोरीच्या मुद्द्यावर पाठिंबा देत निवडणूकीत केली जाते, कोणते मुद्दे उपस्थित केले जावू शकतात, याबाबत दिशा दिली.

आ.जयंतराव पाटील यांच्या सुरात सूर मिसळून खा.विशाल पाटील यांनी जयंतराव पाटलांना अप्रत्यक्ष पाठिंबा दिला असून काँग्रेस आणि राष्ट्रवादी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक आघाडी करून लढविण्याचे संकेत दिले आहेत. आ.जयंतराव पाटील आणि गोपीचंद पडळकर यांच्यात सुरु झालेल्या शाब्दिक वार - प्रतिवारानंतर राजकीय कुरुक्षेत्रावर खासदार विशाल पाटील यांची इंट्री झाल्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार का? असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे.

## संक्षिप्त...

### ‘सीपीआर’ मध्ये चोरांचा विळखा : रुग्ण त्रस्त

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाला (सीपीआर) सध्या चोरांनी विळखा घातला आहे. येथील ढिसाळ सुरक्षा व्यवस्थेमुळे डॉक्टर, कर्मचारी, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक त्रस्त झाले आहेत. लॅपटॉप, मोबाईल, पैशाच्या बॅगा लंपास होण्याच्या घटनांत वाढ झाली आहे.

### बदल्यांमुळे ४८ शाळा होणार शिक्षकाविना

**सोलापूर : हॅलो प्रभात**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्ह्यांतर्गत बदल्या झाल्या आहेत. बदलीतील तांत्रिक अडचणीमुळे जिल्ह्यातील ४८ शाळांमध्ये एकही शिक्षक शिल्लक राहणार नाही.

त्यामुळे त्या शाळा शिक्षकाविनाच राहण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील तीन हजार ७३७ शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या झाल्या आहेत.

### कोल्हापुरात ध्वनियंत्रणा कडाडल्या : नागरिक त्रस्त

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

नूतन जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी आठवडाभरापूर्वीच जिल्ह्यात नागरिकांना कानठळ्या बसविणाऱ्या ध्वनियंत्रणा आणि डोळ्याला इजा करणाऱ्या लेसर किरणांच्या यंत्रणेला मज्जाव करण्याचा आदेश पोलिस यंत्रणेला दिला होता.

तथापि, कोल्हापुरात गेल्या दोन दिवसांत गणेश आगमनाच्या मि रवणुकीत ध्वनियंत्रणाही कडाडल्या आणि सोबतीला लेसर किरणेही भिरभिरली. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

### कोडोलीत येथे बालिकेला पळवून नेण्याचा प्रयत्न

**कोडोली : हॅलो प्रभात**

कोडोलीतील वैभवनगर येथे अनोळखी महिलेने घरामागे एकट्याच खेळणाऱ्या उमिरा सद्दाम आत्तार या पाच वर्षीय बालिकेला पळवून नेण्याचा प्रयत्न केला.

मात्र, चिमुकलीचा आक्रोश ऐकून धावून आलेल्या शेजारी कमल ढेरे यांनी हा प्रयत्न हाणून पाडला.

या घटनेमुळे परिसरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त झुंबा फिटनेस कार्यक्रम

**पुणे : हॅलो प्रभात**



येथील आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या श्री शाहू मंदिर महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय, अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड रिसर्च आणि अनंतराव पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चर यांच्या सहयोगाने संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॅम्पस मध्ये झुंबा फिटनेस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. विलास पाटील प्राचार्य श्री शाहू मंदिर महाविद्यालय यांनी केले. प्रास्ताविक डॉ. सुदाम शेळके, क्रीडा संचालक शाहू मंदिर महाविद्यालय व संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी केले यामध्ये त्यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा कार्याबद्दल मार्गदर्शन केले. तर आभार प्रदर्शन क्रीडाशिक्षक प्रा. सुजित मेढेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी डॉ. शेरुमल शेंडे, डॉ. राणी शितोळे, डॉ.अर्चना लडकत, प्रा. आकाश दोडके यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक डॉ. नवनाथ सरोदे यांनी केले. विद्यार्थ्यांसाठी असे नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेच्या सरचिटणीस प्रमिलाताई गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## मराठा आरक्षण देण्यास राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

### हर्षवर्धन सपकाळ ; ७ दिवसात आरक्षण देण्याचे काय झाले?

**मुंबई : हॅलो प्रभात**

मराठा आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते आणि तीच भाजपा व देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. हा आजचा प्रश्न नसून अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे. मराठा समाजाला दिलेले आरक्षण भाजपा व फडणवीस सरकारने सुप्रीम कोर्टात इम्पिरिकल डेटा दिला नाही म्हणून गेले. सत्ता द्या ७ दिवसात मराठा आरक्षण देतो अशी वल्गणा करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेच काय झाले? असा संतप्त प्रश्न विचारून



भाजपा सरकारला आरक्षणाच्या नावाखाली फक्त मराठा व ओबीसी समाजात भांडणे लावायची आहेत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस पक्षाचे नेते कोल्हापूरचे खा. श्री. शाहू महाराज छत्रपती व खा. डॉ. कल्याण काळे यांनी टिळक भवन येथे पत्रकार परिषद घेऊन मराठा आरक्षण आंदोलनाबाबत काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा मराठा समाजाने तीन महिन्यापूर्वी केली होती पण सरकारने या तीन महिन्यात काहीच हालचाल केली नाही. आता मात्र मराठा समाजाची अडवणूक केली जात आहे, आधी परवानगी दिली नाही नंतर एका दिवसाची परवानगी दिली. मुंबईत वाहतूक व्यवस्थेसह परिस्थिती बिघडल्याचे सांगितले जात आहे पण मुंबईतील आजच्या परिस्थितीस भाजपा सरकारच जबाबदार आहे. तीन महिने सरकार झोपले होते काय? मुंबईतील परिस्थितीसाठी मराठा आंदोलकांना बदनाम करू नका, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

## ‘डीकेटीई’मध्ये गणेशोत्सवनिमित्त गड किल्ल्यांचे सादरीकरण



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

डीकेटीईमध्ये नेहमीच सम ाजउपयोगी विषयावर प्राधान्य दिले जाते याचाच भाग म्हणून डीकेटीईच्या गणेशोत्सवाचे औचित्य साधत यावेळी युनेस्को यांनी जागतिक वारसा स्थळ जाहिर केलेल्या १२ किल्लूयांवर अधारित सजावट व श्रीं ची मूर्ती साकरण्यात आली आहे. युनेस्कोच्या यादीत सध्या भारतातील ४२ वारसा स्थळांचा समावेश आहे आणि युनेस्कोने नुकतेच जाहीर केलेल्या यादीमध्ये छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या १२ किल्लूयांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे याचेच सादरीकरण यावेळीच्या गणेशोत्सावामध्ये डीकेटीईच्या विद्यार्थ्यांनी दरबार हॉल मध्ये केलेले आहे.

जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आलेल्या हे सर्व किल्ले १७ व्या शतकात बांधले गलेले आहे हे किल्ले मराठा सैन्याच्या लष्करी व्यवस्थेचा आणि तटबंदीचा भक्कम पुरावा आहेत याची सर्व माहिती विद्यार्थ्यांनी या वर्षीच्या गणेशोत्सामध्ये साकारलेली आहे यामुळे महाराष्ट्रातील संस्कृतीचे महत्वाचे वर्णन करण्यात आले आहे. याशिवाय श्रीं ची मूर्तीची प्रतिष्ठापनेची आरास मेगडंबरीमध्ये करण्यात आली आहे. सदर उपक्रमास संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, सचिव डॉ सपना आवाडे, ट्रेझरर पी.डी. दत्तवाडे ट्रस्टी डॉ ए.बी. सौंदत्तीकर, स्वानंद कुलकर्णी, कार्यकारी संचालक रवी आवाडे यांनी भेट देवून विद्यार्थ्यांचे व मागदर्शकांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांस संस्थेचे डायरेक्टर प्रा.डॉ.एल.एस.आडमुठे, डे. डायरेक्टर डॉ यु.जे.पाटील यांचेसह सर्व विभागप्रमुख यांचे मागदर्शन लाभले तर विद्यार्थी प्रतिनिधी कमल शर्मा, किरण नाईक, आयुष पाचोरे, रमा कांबळे, जान्हवी पाटील, यश चौगुले, प्रणिता दरुरे, आयुष पाटील यांनी सदर देखावा साकरण्यास परिश्रम घेतले.

## मिलिंद काळे यांना डॉ.डी.वाय.पाटील जीवन गौरव पुरस्कार

### लेफ्टनंट जनरल भूपेश के.गोयल कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून सन २०२५- २६ साठीचा ’डॉ. डी.वाय.पाटील जीवनगौरव पुरस्कार’ कॉसमॉस बँकेच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांना जाहीर झाला आहे. सोमवार दि. १ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या २० व्या स्थापना दिनी आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसचे महासंचालक लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमात हा सन्मान प्रदान केला जाणार असल्याची माहिती कुलपती





डॉ. संजय पाटील व कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा यांनी दिली. या समारंभाला डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील यांची उपस्थितीत राहणार आहे.

विद्यापीठाच्या २० व्या स्थापना दिनी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठ प्रांगणात ध्वजवंदन व विद्यापीठ गीत होणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता हॉटेल सयाजीच्या मेघ मल्हार सभागृहात पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. यावेळी जीवन गौरव पुरस्कारासह, आदर्श शिक्षक, आदर्श सेवक, गुणवंत विद्यार्थी असे विविध पुरस्कार प्रदान केले जाणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी दिली.

आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसचे महासंचालक लेफ्टनंट जनरल भूपेश के. गोयल हे या कार्यक्रमास प्रमुख अतिथी आहेत. ३५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसमध्ये विविध पदांवर काम केले. सध्या महासंचालक (कर्मचारी आणि संघटन) म्हणून कार्यरत असून यापूर्वी दिल्ली मुख्यालय येथे मेजर जनरल म्हणून काम केले. बागडोग्रामध्ये ६०० खाटांच्या तर पुण्यात ११०० खाटांच्या कमांड हॉस्पिटलचे त्यांनी नेतृत्व केले आहे. उच्च जोखीम प्रसूती, गाइनॉकॉलॉजी कॅन्सर, वंध्यत्व, युरोगायनॅकोलॉजी याचबरोबर २ हजाराहून अधिक हायस्टेरोस्कोपिक व शेकडो मोठ्या शस्त्रक्रिया त्यांनी यशस्वीरित्या पार पाडल्या. आर्म्ड फोर्स मेडिकल सर्व्हिसेसमध्ये रोबोटिक सर्जरीची सुरुवात केली. त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल ‘अति विशिष्ट सेवा पदक’ आणि ‘विशिष्ट सेवा पदक’, ‘रक्षा मंत्री ट्रॉफी’ने त्यांना सन्मानित करण्यात आले असल्याची माहिती डॉ. शर्मा व डॉ. भोसले यांनी दिली.












# साथीच्या आजारात खबरदारी महत्वाची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार जानेवारी ते १४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात एन्फ्लुएंजा आजाराचे ( फ्ल्यू ) ६६३ रुग्ण आढळले आहेत यापैकी १४ रुग्ण मागील दीड महिन्यात आढळले असून तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अर्थात ही सरकारी आकडेवारी आहे. रुग्णांची संख्या यापेक्षा कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे केवळ फ्ल्यू आजारानेच नव्हे तर डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहेत. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाचे रुग्ण आढळत आहे नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. पाच वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

# भारताचे अणुऊर्जाविषयक धोरण

**हॅलो प्रभात**

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस म्हणजे इ. स. ६ ऑगस्ट १९४५ ला अमेरिकेने अणुबाँबचा पहिला प्रयोग हिरोशिमावर केला व जपानला शरणागती पत्करावयास लावली. त्याचवेळी अशा अस्त्रांची भयंकर संहारक्षमता पाहून जगातील विचारवंतांना धक्का बसला आणि अशा अस्त्रांच्या नियंत्रणाबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर काही योजना करणे अत्यावश्यक आहे, एवढ्यापुरते जगातील सर्व प्रमुख राजकीय नेत्यांचे एकमत झाले. अणुऊर्जेची संहारक्षमता प्रचंड असली तरी मानवी सुखसमृद्धी-साठीही तिचा पुष्कळ उपयोग करता येण्यासारखा आहे; म्हणून ज्यांच्यापाशी ती ऊर्जा कमीअधिक प्रमाणात आहे, ज्यांना ती प्राप्त होण्यासारखी आहे आणि ज्यांना आज तरी अशी शक्यता नाही, अशा सर्वच राष्ट्रांना तिच्या उपयोगाबद्दल आपापले धोरण ठरविणे, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय पातळीवरही विचारविनिमय करणे आवश्यक झाले आहे.

आज अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, रशिया व चीन ही प्रत्यक्ष अण्वस्त्रे निर्माण करणारी राष्ट्रे आहेत. तथापि भारत, इझ्राएल, ईजिप्त, पश्चिम जर्मनी, जपान, स्वीडन व कॅनडा ह्या राष्ट्रांनी अणुऊर्जेचे उत्पादन व तिचा शांततामय कार्यासाठी वापर ह्या बाबतींत पुष्कळ प्रगती केली आहे. प्रसंग आल्यास अण्वस्त्रांची निर्मिती करण्याची क्षमताही त्यांना कमीअधिक प्रमाणात प्राप्त झाली आहे. अणुऊर्जाविषयक वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल, तसतशी नवीन राष्ट्रेही या मालिकेत येण्याचा संभव आहे. याचा परिणाम अण्वस्त्रविषयक जागतिक धोरणावर झालेला दिसून येतो.

### अणुऊर्जेचा विनियोग

शांततामय कार्यासाठी अणुऊर्जेचा विनियोग करावा, हे उद्दिष्ट सर्व राष्ट्रांचे आहे. परंतु सर्वच राष्ट्रांजवळ त्यासाठी आवश्यक असे तांत्रिक ज्ञान व साधनसामग्री असणे शक्य नाही. त्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यावरच अशा राष्ट्रांना अवलंबून राहिले पाहिजे. या दृष्टीने जुलै १९५७मध्ये संयुक्त राष्ट्रांनी व्हिएन्ना येथे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा मंडळ (इंटरनॅशनल टॉमिक एनर्जी एजन्सी) स्थापन केले. अणुऊर्जेचा शांततामय कार्यासाठी जास्तीत जास्त वापर कसा करता येईल व त्यासाठी सभासद राष्ट्रांनी उपलब्ध केलेल्या साधनसामग्रीचे योग्य वाटप कसे करावे, ह्यासंबंधी हे मंडळ विचार करते. आज ह्या संघटनेचे शंभराहून अधिक सभासद आहेत. ह्याच कार्यासाठी काही प्रादेशिक मंडळेही स्थापण्यात आली असून यात युरोपातील 'यूरेटम' ही संघटना प्रमुख आहे. यूरोपीय सामायिक बाजारपेठेतील सहा देशच ह्या संघटनेत आहेत. भांडवल, श्रमशक्ती, साधनसामग्री वगैरे बाबतींत संपूर्ण सहकार्य करणे हा ह्या संघटनेचा हेतू आहे आणि त्या दृष्टीने अमेरिका, कॅनडा, ब्रिटन अशा प्रगत राष्ट्रांबरोबर वैज्ञानिक सहकार्याचे करारही ह्या संघटनेने केले आहेत.


### अमेरिकेचा अणुबाँबचा पहिला प्रयोग

अमेरिकेने अणुबाँबचा पहिला प्रयोग १९४५ मध्ये केला. १९४९ मध्ये रशियाने पहिला चाचणी अणुस्फोट करून अमेरिकेची ह्या क्षेत्रातील मक्तेदारी नष्ट केली होती. ब्रिटनने पहिला चाचणी–अणुस्फोट १९५२ मध्ये केला. अमेरिकेने १९५२ मध्ये व रशियाने १९५३ मध्ये हायड्रोजन–बाँबचे चाचणी स्फोट करून ह्या ऊर्जेची भीषणता जगाच्या निर्देशनास प्रखरतेने आणून दिली. पुढे १९५८ मध्ये फ्रान्सने व १९६४ मध्ये चीनने अण्वस्त्रस्फोट करून अण्वस्त्रांच्या स्पर्धेत प्रवेश केला. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील प्रमुख राष्ट्रांचे अमेरिका व रशिया यांच्या नेतृत्वाखाली दोन गट पडले. त्या प्रत्येक गटाजवळ अण्वस्त्रनिर्मितीची अपार क्षमता असल्यामुळे त्यांच्या संघर्षातून जगाचा नाश होण्याची शक्यता निर्माण झाली व त्यामुळेच ह्या बाबतीत आंतरराष्ट्रीय नियंत्रण असण्याची आवश्यकता प्रकर्षाने जाणवू लागली. म्हणून १९४६ पासून आजतागायत ह्या प्रश्नावर विचारविनिमय कसा झाला व त्यातून फलनिष्पत्ती काय झाली, हे पाहणे आवश्यक आहे.

पारंपरिक शस्त्रांच्या कपातीचा प्रश्न १९३० पासून राष्ट्रसंघाच्या विचाराधीन होताच. अण्वस्त्रांच्या शोधामुळे त्यास निराळे वळण लागले.

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या पहिल्याच अधिवेशनात अणुऊर्जेवर नियंत्रण व पारंपरिक शस्त्रांची कपात ह्यांसाठी दोन भिन्न आयोग नेमण्यात आले. पाश्चिमात्य राष्ट्रे आणि रशिया यांमधील आत्यंतिक मतभेदामुळे दोन्ही आयोग काहीही निश्चित कार्य करू शकले नाहीत. शेवटी १९५२ मध्ये त्यांचे एकत्रीकरण करून एकच नि:शस्त्रीकरण आयोग नेमण्यात आला. या आयोगाच्या व त्याच्या उपसमितीच्या अनेक बैठकी होऊनही सर्वमान्य अशी एकही योजना होऊ शकली नाही.

पाश्चिमात्य राष्ट्रे, अमेरिका व रशिया ह्यांच्यामध्ये नियंत्रणाच्या आवश्यकतेबाबत एकमत असूनही तपशीलांबाबत, विशेषत: अण्वस्त्र-निर्मितीच्या आंतरराष्ट्रीय तपासणीसारख्या मुद्द्यांबाबत, सतत मतभेदच होत राहिले. १९५५ साली जिनिव्हा येथे भरलेल्या अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व रशिया या राष्ट्रांच्या शिखर परिषदेत नि:शस्त्रीकरणाच्या धोरणास पाठिंबा देण्यात आला; पण निश्चित धोरण ठरू शकले नाही. १९५७ मध्ये भारतासह चौदा नवीन सभासदांची नियुक्ती या आयोगावर करण्यात आली; परंतु रशियाने ह्या नव्या आयोगावर बहिष्कार घातला.



आंतरराष्ट्रीय अणुचाचणीविरोधी दिवस...

### अण्वस्त्रबंदी

अण्वस्त्रबंदीच्या विचाराला पोषक वातावरण निर्माण करण्याच्या हेतूने १९५८ मध्ये अमेरिका, ब्रिटन व रशिया ह्यांनी अण्वस्त्रचाचणी–प्रयोग एक वर्ष स्थगित करण्याची घोषणा केली. पुढे १९६१ मध्ये रशियाने व लगेच अमेरिकेने चाचणी–प्रयोग सुरू केल्यामुळे प्रथम स्वेच्छेने घातलेली बंदी निरर्थक झाली. १९६२ पासून मात्र या चर्चेस नवीन वळण लागले. संपूर्ण अण्वस्त्रबंदीच्या दृष्टीने जरी प्रगती झाली नाही, तरी त्या दिशेने काही निश्चित स्वरूपाची पावले टाकण्यात आली. १९६३ मध्ये अमेरिका, ब्रिटन व रशिया यांनी मॉस्को–आंशिक चाचणीबंदी–तह या नावाचा तह करून अत:पर हवेत, पाण्याखाली अगर बाह्य अवकाशात अणुस्फोटाचे चाचणी–प्रयोग बंद करण्याचे मान्य केले. भारतासह शंभराहून अधिक राष्ट्रांनी ह्या तहावर सह्या केल्या आहेत.फक्त फ्रान्स व चीन ह्यांनी सह्या करण्यास नकार देऊन आपले त्याविषयीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. पुढे १९६७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या संमतीने अमेरिका, रशिया व ब्रिटन ह्यांनी बाह्य अवकाशात, चंद्रावर, अगर अन्य ग्रहांवर अण्वस्त्रे अगर अन्य संहारक अस्त्रे ठेवण्यास प्रतिबंध करणारा तह संमत केला. १९६८ मध्ये अमेरिका व रशिया ह्यांनी संयुक्तपणे अण्वस्त्र–प्रसार–बंदीच्या ठरावाचा मसुदा संयुक्त राष्ट्रांपुढे ठेवला व सभासदराष्ट्रांनी तो मान्य करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. जी राष्ट्रे आज अण्वस्त्रे तयार करीत नाहीत, त्यांनी त्यांचे उत्पादन करू नये, एवढेच नव्हे, तर ती अन्य ठिकाणाहून संपादनही करू नयेत; त्याच अनुषंगाने ज्यांच्याजवळ अशी अस्त्रे आहेत, त्यांनी ती इतरांस देऊ नयेत अगर त्यांच्या उत्पादनात साहाय्यही करू नये, अशी अर्थाची कलमे ह्या ठरावात घालण्यात आली आहेत. अमेरिका आणि रशिया ह्यांना हा ठराव म्हणजे मोठा विजय वाटत असला, तरी अनेक राष्ट्रांचा त्याच्या मूलभूत तत्त्वालाच विरोध आहे. ह्या ठरावामुळे अण्वस्त्रधारी राष्ट्रांचे जगात कायमचे वर्चस्व राहील, असे त्यांना वाटते. उदा., आज ज्यांच्याजवळ अण्वस्त्रे नाहीत त्यांना ती कधीच लाभू नयेत हाच ठरावाचा हेतू आहे, असे फ्रान्सचे मत आहे. चीनच्या मते हा ठराव म्हणजे भयंकर फसवणुकीचा नमुना आहे. एका बाजूला रशियासारखे अण्वस्त्रसज्ज राष्ट्र असता आपल्या राष्ट्राला अण्वस्त्रांच्या बाबतीत दुर्बल राहून चालणार नाही, असे पाश्चिम जर्मन सरकारचे मत आहे.

अण्वस्त्र–प्रसरणबंदी–ठरावापुरते जरी अमेरिका व रशिया यांचे एकमत असले, तरी संपूर्ण अण्वस्त्रबंदीसंबंधी त्यांचे दृष्टिकोन फार भिन्न आहेत. बंदीचे तत्त्व मान्य असूनही या दोनही प्रतिस्पर्धी राष्ट्रांनी अण्वस्त्रनिर्मितीची स्पर्धा चालूच ठेवली आहे. या राष्ट्रांच्या पातळीवर येण्याची फ्रान्सची महत्त्वाकांक्षा असल्याने फ्रान्सला कोणत्याही प्रकारचे बंधन मान्य नाही. साम्यवादी चीनचे तर दोन्ही गटांशी वितुष्ट होते. अर्थात ह्या राष्ट्राचे धोरण ह्या बाबतीत अनिर्बंधच राहणार.

अण्वस्त्रासंबंधीचे भारताचे धोरण स्पष्ट आहे. अण्वस्त्रांवर संपूर्ण बंदी घातली पाहिजे, असे भारताने संयुक्त राष्ट्रांत आणि बाहेरही आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

ह्या तत्त्वानुसार भारताने अणुऊर्जेचा उपयोग संहारक शस्त्रांच्या निर्मितीसाठी केलेला नाही व तसा तो केला जाणारही नाही, असे भारतीय नेत्यांनी पुन:पुन्हा स्पष्ट केले आहे. तथापि जगात अण्वस्त्रनिर्मितीची स्पर्धा अशीच चालू राहिली आणि चीन, पाकिस्तानसारख्या शेजारच्या राष्ट्रांनी निराळी धोरणे अंगीकारली, तर भारताला आपल्या धोरणाचा पुनर्विचार करावा लागेल.

अण्वस्त्र–प्रसरणबंदी–ठरावासंबंधी विचार-विनिमय करण्यासाठी अण्वस्त्ररहित अशा ९२ राष्ट्रांची परिषद संयुक्त राष्ट्रांतर्फे ऑगस्ट–सप्टेंबर १९६८ मध्ये जिनिव्हा येथे भरविण्यात आली होती. चीनखेरीज इतर चार अण्वस्त्रधारी राष्ट्रांनीही तीत भाग घेतला. परिषदेनंतर निघालेल्या पत्रकात असे म्हटले आहे, की अणुयुगात प्रत्येक राष्ट्रास संरक्षणाची हमी मिळणे अगत्याचे आहे. जागतिक शांतता व आर्थिक प्रगतीसाठी शस्त्रास्त्रांची स्पर्धा बंद झाली पाहिजे. अण्वस्त्र–प्रसारणबंदी–ठरावानंतर संपूर्ण नि:शस्त्रीकरणाची योजनाही कार्यवाहीत आली पाहिजे. तोपर्यंत काही अण्वस्त्ररहित टापूही जगात निर्माण करण्यात यावेत. सर्व राष्ट्रांना अणुऊर्जेचा शांततामय कार्यासाठी उपयोग कसा करावा ह्याचे शास्त्रीय ज्ञान व साधने मिळाली पाहिजेत. त्यासाठी अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी आर्थिक व अन्य मदत देऊन आंतरराष्ट्रीय सहकार्य केले पाहिजे. अण्वस्त्रांचा संपूर्ण साठा नष्ट केल्याखेरीज व नवीन निर्मितीवर संपूर्ण बंदी घातल्याखेरीज अण्वस्त्रांचे जगावरील संकट नष्ट होणार नाही. कारण सबंध जगभरात आज आण्विक उत्क्रांतीचे पेव फुटलेले दिसून येत आहे.

ज्याप्रमाणे आण्विक घटक देशांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोगात आणले जाऊ शकते त्याचप्रमाणे ते देशाच्या रक्षणार्थ सुद्धा उपयोगात आणले जाऊ शकते हे आजपर्यंत सिद्ध झाले आहे. म्हणूनच देशाची संरक्षण व्यवस्था अधिकाधिक बळकट करण्यासाठी जगभरातील देशांमध्ये एक प्रकारची ओढ लागली आहे. मग त्यासाठी अनेक अणु चाचण्यांचा क्रम लागला आहे. याची सुरुवात आपल्याला विसाव्या शतकाच्या मध्यकाळात झाल्याचे दिसून आले आहे. १६ जुलै १९४५ रोजी पहिली आण्विक शस्त्रे चाचणी घेण्यात आली होती. त्यानंतर आत्तापर्यंत जवळपास २००० चाचण्या घेतल्या गेलेल्या आहेत. अशा आण्विक चाचण्यांमुळे त्या प्रदेशातील जीवन संरचना समूळ नष्ट झाल्याचे परिणाम दिसून आले आहेत.

***• म्हणूनच आणखी पुढील आण्विक शस्त्रे यांची चाचणी रोखण्यास एकीने प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित करण्यासाठी आणि जगाचे लक्ष वेधून घेण्यासाठीच्या उद्देशाने शैक्षणिक कार्यक्रम, उपक्रम आणि संदेश यांच्या माध्यमातून जगभर जनजागृती निर्माण करण्यासाठी २९ ऑगस्ट हा 'आंतरराष्ट्रीय अणुचाचणी विरोधी दिवस' पाळण्यात येतो.***

# गणेशोत्सव : टिळकांच्या प्रेरणेपासून 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास

**दै.हॅलो प्रभात**

भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत. लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.या माध्यमातून सामाजिक एकोपा संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरु करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव राज्य वैभवी बाण्यामध्ये महाराष्ट्रात सर्वत्र सुरु आहे.

### टिळकांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय

सन १८९३ साली लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती. परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या,समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकरण झाले.पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला.



### गणेशोत्सवाचे प्रदेशनिहाय स्वरूप

महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पोर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कवी संमेलन आणि विविध गुण प्रदर्शनाचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव नागपूर, अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षाची परंपरा आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते. पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना शंभर वर्षांहून अधिक परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते.प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

### उत्सवाचे स्वरूप : धार्मिकतेपासून वार्षिक आनंदोत्सवापर्यंत

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पध्दतीने साजरा केला जातो. शेकडो बाल गणेश मंडळे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या बिजारोपणासाठी प्रेरणास्त्रोत होऊन जातात. मुलांमध्ये संघटन शक्ती, कला, कौशल्य, नेतृत्व. विकासासाठी हा महोत्सव पुढे येतो. महाराष्ट्रामध्ये घडलेल्या शेकडो कलाकारांना गणेश महोत्सवाच्या व्यासपीठानेच पहिली संधी दिली आहे. हा जागर आताही कायम आहे.

### कला, नेतृत्व व समाजप्रबोधनाचे व्यासपीठ

गेल्या शंभर वर्षांत गणेशोत्सवाने हजारो कलाकार, कवी, नकलाकार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, शिल्पकार यांना व्यासपीठ दिले. सामाजिक समस्यांवर देखावे, शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक मूर्ती यांमुळे या उत्सवात जागरूकता आणि प्रबोधन घडते. गणेशोत्सव हे नेतृत्व विकसित करणारी शाळाच म्हणावी लागेल. स्वयंसेवकांचे संघटन, व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन या सर्व गोष्टी किशोरवयातील शाळकरी मुलांना,तरुणांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देतात.

### महाराष्ट्र शासनाचा निर्णय : राज्य उत्सवाचा दर्जा

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २०२५ पासून गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी विधिमंडळात १८ जुलैला या संदर्भातील घोषणा केली आहे. हा निर्णय घेताना राज्य शासनाने सांस्कृतिक कार्य संचालनालय,पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव,तसेच प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनाही कार्य विभागून दिले आहेत. राज्य शासनाने आपल्या शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यांसाठी एकत्रित आणणे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयाचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे.

लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, गणेशोत्सव आता केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता, तो कला, संस्कृती, समाजजागृती, नेतृत्व आणि आर्थिक चैतन्याचा अविभाज्य भाग बनला आहे. टिळकांचा हा वारसा आज राज्याच्या गौरवाचा उत्सव बनला आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने गणपती बाप्पा मोरया!

• प्रवीण टाके
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूरे

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३०

■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# हॅलो प्रभात
## सांगली-कोल्हापूर
जिल्हा विशेष ▪ शनिवार, ३० ऑगस्ट २०२५






## संमिश्र

### डी.सी.नरके कॉलेजमध्ये रंगला झिम्मा-फुगडी कार्यक्रम



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

डी.सी.नरके ज्युनि.कॉलेज कुडित्रे येथे झिम्मा-फुगडी कार्यक्रम व राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सौ. वैष्णवी पाटील (पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग) उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य ए. एम. पाटील सर,प्रशासकीय अधिकारी बी.आर.अकिवाटे, सौ. प्रियंका नाळे, सौ. प्रियंका हिर्डेकर तसेच सर्व प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होत्या . कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. आर. एस. नायकवडी मॅडम यांनी केले. यावेळी प्रा.श्री पी.आर. पाटील सर यांनी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद जन्मदिन तसेच माजी प्राचार्य स्व .एम.ए. मंडोलकर सर स्मृतिदिन विषयी माहिती दिली. प्रमुख पाहुण्या सौ.पाटील यांनी विद्यार्थीनींना उद्देशून बोलताना,पारंपारिक संस्कृतीचे जतन करा आणि यशस्वी होण्यासाठी अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतोअसे प्रेरणादायी आवाहन केले. प्राचार्य व प्रशासकीय अधिकारी यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुल्ला मॅडम यांनी तर आभार लवटे मॅडम यांनी केले. प्राध्यापक सचिन पाटील सर आणि जालंदर अंगठेकर सर ही उपस्थित होते.

### श्री.वसंतराव जयवंतराव देशमुख स्कूलमध्ये क्रीडा दिन साजरा



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

येथील श्री.वसंतराव जयवंतराव देशमुख सेकंडरी इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रीय तायक्कांडो खेळाडू कु.श्रावणी फाळके व कु. हर्षाली सुर्वे यांच्या उपस्थितीत तसेच मुख्याध्यापक सुरेश कांबळे यांच्या हस्ते हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.सहाय्यक शिक्षिका सौ. प्रियांका कोरवी यांनी क्रीडा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त करून क्रीडेमुळे होणारे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास अधोरेखित केला. या कार्यक्रमाला संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुमनताई वसंतराव देशमुख, सचिव शारंगधर वसंतराव देशमुख, उपाध्यक्ष सुनिल कुरणे, मुख्याध्यापक सुरेश कांबळे, क्रीडा शिक्षक संग्राम पाटील, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कला उत्सवात भारतमाता विद्यालय चमकले



**चिकुर्डे : हॅलो प्रभात**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली यांचे वतीने आयोजित विभागस्तरीय कला महोत्सवात येथील भारतमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने विविध कला प्रकारात उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सांगली येथील राजमाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे स्पर्धा संपन्न झाल्या. जिल्ह्यातील अनेक शाळा सहभागी झाल्या होत्या. या कला उत्सवात भारतमाता विद्यालयाने स्वच्छता संदेश देणारे नाट्य उत्कृष्ट सादर केले. यामध्ये इ. दहावी मधील मयुरी पांढरबळे, सोफिया मुल्ला, स्वरूप व शिवम पांढरबळे, यश पांढरबळे आदी विद्यार्थी सहभागी होते. त्याचबरोबर लोकगीतामध्ये संस्कृती मलगुंडे वृषाली देशमुख,संस्कृती पाटील, प्रांजली भोसले यांनी तर लोकनृत्य मध्ये श्रद्धा जाधव, तनया सपाटे, श्रावणी नांगरे,परिणीता कांबळे आदी विद्यार्थिनींनी उत्कृष्ट सादरीकरण करत वाहवा मिळवली. विद्यालयाचे कलाशिक्षक जयेंद्र कांबळे व रणजीत आवळे यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सर्व विद्यार्थ्यांचे नवभारत शिक्षण मंडळाचे संचालक गौतम पाटील, उपसंचालक बी आर थोरात, डी. एस.माने, शालेय समितीचे रणजीतदादा पाटील,डोईजड काका, मुख्याध्यापक डी. बी.सरगर,पर्यवेक्षक विश्वास पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

### २,४०,००० जीवनांसाठी जलसुरक्षा सुनिश्चित

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

टाटा कॅपिटल आपल्या प्रमुख जलआधार कार्यक्रमाद्वारे ग्रामीण समुदायांसाठी जलसंवर्धनात महत्त्वाची भूमिका बजावत असुन आर्थिक वर्ष २०२५ मध्ये जलआधार उपक्रम २०० हून अधिक गावांमधील २४०,००० लोकांपर्यंत पोहोचला आणि २५,२७४ लाख लिटर नवीन जलसाठा क्षमता निर्माण केली.

## गरवारे कन्या महाविद्यालयात इतिहास विषयावर कार्यशाळा

**सांगली : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि श्रीमती मथूबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली, इतिहास आणि आय. क्यू. ए. सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए भाग २ व्होकेशनल स्किल कोर्स या विषयाच्या सुधारित अभ्यासक्रम ाच्या कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आले . उद्घाटन सत्रात बीजभाषक इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ। चंद्रवदन नाईक यांनी शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेची गरज व नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांनी केले.त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील हेतू सांगितला. अध्यक्षस्थानी वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्यवाह श्रीमती गायत्री कुलकर्णी होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन करून शुभेच्छा दिल्या .आभार कार्यशाळा व आय. क्यू . ए.सी.समन्वयक डॉ.उर्मिला क्षीरसागर यांनी मांनले.



प्रथम सत्रात डॉ. निरंजन कुलकर्णी यांनी वस्तूसंग्रहालय म्हणजे काय, त्यांचे प्रकार इत्यादी मुद्द्यावर प्रकाश टाकला .अध्यक्षस्थानी डॉ. डी. पी. खराडे होते. आभार डॉ. लीना पाटील यांनी मानले.

दुसऱ्या सत्रात डॉ. संतोष जेटीथोर यांनी वस्तुसंग्रहालय शास्त्राची ओळख करून दिली व त्याचे महत्त्व विशद केले. अध्यक्षांनी डॉ.बी. ए .कोटलगी होते. आभार डॉ. व्हि.एम. होनमोरे यांनी मानले. तिसऱ्या सत्रात डॉ. सुरेश चव्हाण यांनी वस्तूसंग्रहालय व्यवस्थापन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी आप्पासाहेब केंगार होते .आभार डॉ. वैशाली जोशी यांनी मानले.समारोप सत्रामध्ये उपप्राचार्य डॉ. नंदिनी काळे यांनी प्रमुख पाहुण्याचे स्वागत करून कार्यशाळेचा दिवसभराच्या सत्रांचा आढावा घेतला. प्रमुख मार्गदर्शक इतिहास अभ्यास मंडळाच्या सदस्या डॉ. आरती नाडगोडा यांनी प्राध्यापकांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून विविध कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित करावी, यासंदर्भात मार्गदर्शन केले .

कार्यशाळेच्या नियोजनाबद्दल डॉ. योगिता मठपती, डॉ.सुजाता देशमुख, डॉ. सचिन बोलाईकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले .

सूत्रसंचालन डॉ.रोहिणी देशपांडे, डॉ. सुनिता नाईक यांनी केले .कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप दळवी डॉ. धनश्री देशपांडे ,प्रा. रेखा पाटील यांचे सहकार्य लाभले.तांत्रिक सहकार्य श्री देविदास मुंडे, प्रा. प्रतीक गिजवणेकर ,श्रद्धा पाटील, निकिता यादव यांनी केले .या कार्यशाळेसाठी वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. लताताई देशपांडे, उपाध्यक्ष श्रीमती स्मिता केळकर, कार्यवाह श्रीमती यशश्री आपटे, सहकार्य श्रीमती गायत्री कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.

## मेजर ध्यानचंदांचा आदर्श विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी : डॉ.मिलिंद हुजरे

**तासगाव : हॅलो प्रभात**

मेजर ध्यानचंद हे भारतीय क्रीडाजगताचे खरे रत्न होते. त्यांचे खेळातील कसब, शिस्त आणि समर्पण आजच्या खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे. असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील म हाविद्यालय तासगाव येथे मेजर ध्यानचंद यांची जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात बोलताना काढले.ते पुढे म्हणाले विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत क्रीडाक्षेत्रातही सक्रिय सहभाग

**वसंतरावदादा महाविद्यालयात 'राष्ट्रीय क्रीडा दिन' उत्साहात**




घ्यावा,कारण खेळ आपल्यात शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक धैर्य आणि नेतृत्वगुण निर्माण करते.यावेळी सांगली प्रीमियर लीग महिला क्रिकेट संघात महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींची निवड झाली. त्याबद्दल त्या दोघींचा सत्कार प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आला.सांगली चाम्पस मध्ये कु.संस्कृती शिवाजी राठोड तर सांगली वॉरियर्स मध्ये कु.संसज्ञा रविंद्र माने हिची निवड झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडासंचालक प्रा.ए.के. पाटील यांनी केले तर आभार कार्यक्रम कमिटी प्रमुख डॉ.साईनाथ घोगरे यांनी मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, खेळाडू, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रेम केंगार यांची सी.आर.पी.एफ.मध्ये निवड

**नातपुते : हॅलो प्रभात**

येथील प्रेम बळीराम केंगार रा.हनुमंतवाडी (ता.फलटण) रहिवासी असून डोक्यावरती आई-वडिलांचे छत्र नसताना अतिशय कठीण परिस्थितीतुन जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने सी. आर. पी. एफ मध्ये प्रशिक्षण पूर्ण केले. अत्यंत खडतर परिस्थिती सुद्धा अत्यंत चांगल्या प्रकारे प्रशिक्षण पूर्ण केल्यामुळे महासंचालक यांच्या हस्ते प्रेम केंगार यांना गौरवण्यात आले. या मुलाचा आदर्श घेण्यासारखे आहे. लग्न झाल्यानंतर त्याला दोन मुले एक मुलगा व एक मुलगी



झाल्यानंतरही त्याने त्याचे प्रॅक्टिस व अभ्यास सोडला नाही. अनेक वेळा तो थोड्या थोड्या मार्कामुळे फेल व्हायचा शेवटी शेवटी त्याला त्याच्या आई-वडिलांची पुण्याई व स्वतःच्या जिद्द चिकाटीमुळे यशस्वी झाला.

## संजीवनमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**पन्हाळा : हॅलो प्रभात**

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स मध्ये २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भारतीय क्रीडा क्षेत्राचे शिल्पकार आणि हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजीव जैन, डिप्लोमा विभागाचे प्राचार्य प्रा. निशांत थरकार व शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. एकनाथ साळोखे यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.क्रिडा शिक्षक



डॉ. रणजीत इंगवले यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा गौरवपूर्ण परिचय करून दिला. ते म्हणाले की, भारतीय क्रीडाक्षेत्राला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून देणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करणे ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी १९२२ मध्ये सैन्यदलात भरती होऊन पुढे हॉकीच्या माध्यम ातून भारताचा झेंडा जागतिक क्रीडाक्षेत्रात फडकावला, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. विनायक देवकर, प्रा. जब्बार मेवेकरी, प्रा. अरविंद भंडारी, प्रा. सरदार देशमुख, प्रा. राजेंद्र खोपडे, प्रा. योगेश साटम, डॉ. गजानन कोळी, डॉ. अजित काटकर, प्रा. धनंजय पाटील, प्रा. सुशील साळोखे, प्रा. प्रदीप पाटील, रजिस्ट्रार दीपक पाटील, प्रसिद्धी प्रमुख संग्राम पाटील यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संजीवन संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले व सहसचिव एन. आर. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

## हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांना अभिवादन



**कोतोली : हॅलो प्रभात**

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन माध्यमिक विद्यालय,माळवाडीच्या मुख्याध्यापिका तेजस्विनी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील,विधी महाविद्यालय प्राचार्य डॉ संगीता पिसे,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सहसमन्वयक डॉ.एस.एस.कुरलीकर होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.एस.एस.मोरे यांनी केले आभार तेजस पोवार याने मानले तर सूत्रसंचालन प्रा.डी.एच.नाईक यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक विद्यार्थीनी उपस्थित होते.

## राजे रामराव महाविद्यालयात 'श्रावणसरी' भितीपत्रिकेचे उद्धाटन

**जत : हॅलो प्रभात**

राजे रामराव महाविद्यालय येथे मराठी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या श्रावणसरी या भित्तीपत्रिकेचे उद्धाटन विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील मराठी विभागात कार्यरत असणारे डॉ.प्रदीप पाटील व प्रसिद्ध कवी डॉ.आसिफ महात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी मराठी विभागप्रमुख प्रा.कुमार इंगळे यांनी आपल्या प्रास्ताविकात उपस्थितांचे स्वागत करून भित्तिपत्रिका



आयोजन करण्यामागील उद्देश सांगितला.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. प्रदीप पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व नवनिर्मितीला प्रेरणा देण्यासाठी भित्तिपत्रिका यासारखे उपक्रम अतिशय स्तुत्य आहेत.

अशा उपक्रमातून विद्यार्थी लिहिण्यास प्रवृत्त होतात. शब्दांचे सामर्थ्य विद्यार्थ्यांच्या लक्षात आले की, कला, साहित्य, चित्रपट व टेलिव्हिजन यासारख्या क्षेत्रात नवनिर्मिती होऊन रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतात.

तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, असेही ते शेवटी म्हणाले. यावेळी प्रसिद्ध कवी डॉ. आसिफ महात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शब्दांचे महत्व जाणून घेण्यासाठी भरपूर वाचन करुन चिंतन मनन केले पाहिजे.

श्रावणसरी ही भित्तिपत्रिका विभाग प्रमुख प्रा.कुमार इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.रेशमा लवटे यांनी विद्यार्थीनकडून तयार करून घेतली. त्यासाठी डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा.सदाशिव माळी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी डॉ.शंकर गावडे, डॉ.अरविंद पवार, प्रा.कृष्णा रानगर, प्रा.धनंजय वाघमोडे व विद्यार्थी उपस्थित होते.

## अमित शेळके यांना पीएचडी



**घुणकी : हॅलो प्रभात**

वाठार येथील अशोकराव माने इंजिनिअरिंग कॉलेज मधील मेकॅनिकल शाखेतील अमित शेळके (रा.निलेवाडी, ता. हातकणंगले) यांना भारती विद्यापीठ पुणे यांची पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी परफॉर्मन्स नालिसिस ऑफ टिल्टेड विक टाईप रीजनरेटिव्ह सोलर स्टील या विषयावरती आपला प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांना डॉ. ज्ञानेश्वर कुंभार व डॉ कैलासनाथ सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थाध्यक्ष विजयसिंह माने, कॅम्पस डसंचालक पी. बी. घेवारी, संचालक डॉ. संगीता चौगुले यांचे मार्गदर्शन मिळाले.

## संजय झांबरे मुख्याध्यापक संघाचे नवे जिल्हाध्यक्ष

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**

नागज (ता.कवठेमहांकाळ) येथील आदर्श प्रशालेचे मुख्याध्यापक संजयकुमार झांबरे यांची सांगली जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी तर ऐनवाडी (ता. खानापूर) येथील अगस्ती विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष नाईक यांची सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

सागली येथे संपन्न झालेल्या संघाच्या जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या. त्यांच्या या निवडीचे विविध स्तरांतून कौतुक केले जात आहे. यावेळी नुतन कोषाध्यक्षपदी विवेक कुंडले,मुख्याध्यापक महामंडळाच्या संपादकपदी भिवाजी पाटील यांच्याही यावेळी निवडी जाहीर करण्यात आल्या.यावेळी उपाध्यक्ष अरविंद कदम,माजी उपाध्यक्ष संभाजी पाटील,राजाराम घाडगे,जीवन

### सचिवपदी संतोष नाईक बिनविरोध



कांबळे,डी एन पाटील,संताजी घाडगे,हिप्परकर सर,राजकुमार बसर्गीसह मुख्याध्यापक संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी नवनिर्वाचित पदाधिकार्याचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. नुतन जिल्हा अध्यक्ष संजयकुमार झांबरे हे शैक्षणिक क्षेत्रातील एक अभ्यासू व दुरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व असुन, शिक्षकांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेत असतात.त्याचबरोबर शालेय शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो असे उदगार उपस्थित मान्यवरांनी सत्कारा प्रसंगी व्यक्त केले.

# शेतकरी आणि सहकारी संस्थांना होणार लाभ

## जिल्हा बँकेच्या ओटीएसमधून ५०० कोटी वसुलीचे टार्गेट

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने थकबाकीदार शेतकरी, सहकारी संस्थांसाठी पुन्हा एकरकमी कर्ज परतफेड योजना (ओटीएस) लागू केली आहे. या योजनेचा लाभ जिल्ह्यातील सुमारे दहा हजारांवर थकबाकीदार शेतकरी तसेच ३५ ते ४० थकबाकीदार सहकारी संस्थांना मिळणार आहे.

जिल्हा बँकेने शेतकरी, स भासद संस्थांसाठी ओटीएस योजना जाहीर केली आहे. यापुर्वीही बँकेने सदर योजनेच्या माध्यमातून थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. त्या योजनेची मुदत संपल्यानंतर शेतकऱ्यांनी पुन्हा या योजनेची मागणी करण्यात आली.



त्यानुसार बँकेने शेतकऱ्यांसाठी वसुली प्रोत्साहन निधी ही योजना आणली आहे. यांतर्गत शेतकऱ्यांकडील अल्प, मध्यम व दीर्घ मुदत कर्जाचे ३० जून २०२१ पूर्वी थकीत असलेले शेतकरी पात्र ठरणार आहेत. या योजनेत शेतकऱ्यांना दिलेल्या व्याजातील सुट, सवलतीपोटी विकास संस्थांना ५ टक्के प्रमाणे वसुली प्रोत्साहन निधी जिल्हा बँक देणार आहे. थकबाकीदार सहकारी संस्थांसाठी जिल्हा बँकेने एकरकमी, सामोपचार (ओटीएस) परतफेड योजना आणली आहे. या योजेनेत मार्च २०२२ पुर्वीच्या थकबाकीदार संस्था, कंपनी व व्यक्तांना सहभाग घेता येणार आहे. बँकेने थकीत कर्जा पोटी सरफेसी कायद्यातंर्गत विक्रीस काढलेलया मालमत्ता बँकेने खरेदी केलेल्या असाव्यात.

ओटीएस स्विकारल्या पासून १५ दिवसात तडजोड रक्कम भरणाऱ्या संस्था व्यक्तांना मार्च २०२५ अखेरच्या एकूण व्याजापैकी २५ टक्के व्याजाची रक्कम वसूल करण्यात येणार आहे. ओटीएस योजनेचा कालावधी ६ महिन्यांचा आहे. या वेळेत कर्ज सहा हप्त्यात परतफेड करावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांनी केले आहे.

# आ.सुहास बाबर यांच्या पाठपुराव्यास यश

## पाच रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा

**आटपाडी : हॅलो प्रभात**

तालुक्यातील ग्रामीण भागातील पाच महत्त्वाच्या रस्त्यांना प्रमुख जिल्हा मार्गाचा दर्जा मिळाल्याची माहिती आमदार सुहास बाबर यांनी दिली. यामुळे या रस्त्यांच्या दुरुस्ती, मजबुतीकरण आणि रुंदीकरणासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी उपलब्ध होणार आहे.



प्रमुख जिल्हा मार्गांत समाविष्ट झालेले रस्ते : पडळकरवाडी - जांभुळणी कामत - नांगरेमळा - आटपाडी (प्रजिमा ४८), म ासाळवाडी- बनुरी -बाळेवाडी - गोमेवाडी ते रामा - १५१ (प्रजिमा ५०), रामा - १५१ ते कौठुळी - पिंपरी खुर्द - आंबेवाडी - बोंबेवाडी - खांजोडवाडी - यपावाडी - माडगुळे, खरसुंडी - बाळेवाडी - करगणी शेटफळे - चिंध्यापीर ते प्रजिमा ५०

जोडणारा मार्ग, शुक्राचार्य हिवतड - गोमेवाडी अर्जुनवाडी खरसुंडी. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली म ागणी पूर्ण झाली आहे. आमदार सुहास बाबर आणि स्व. आमदार अनिल बाबर यांनी राज्य शासन व संबंधित अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून हा निर्णय मंजूर करून घेतला. यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी सोयीस्कर मार्ग उपलब्ध होईल.

ग्रामीण भागातील लोकांचा शहराशी संपर्क अधिक सुकर होऊन रोजगाराच्या संधी वाढतील. निधी उपलब्ध झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग ही कामे वेळेत पूर्ण करू शकेल.

---

## आवाज मर्यादेचे उल्लंघन केलेल्या कारवाईचा प्रस्ताव

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

गणेश आगमनावेळी शहरात विविध ठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करुन मिरवणूक सुरू असलेल्या साऊंडच्या दणदणाट प्रकरणी पोलिसांनी कारवाईला सुरूवात केली आहे. आवाज मर्यादेचे उल्लंघन केलेल्या शहरातील तब्बल २७ मंडळांचे पंचनामे पोलिसांनी पूर्ण केले असून ध्वनीमापक मिटरचे नमुने आणि कारवाईचा प्रस्ताव न्यायालयात सादर करण्यात येणार आहे.

यामध्ये गावभाग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ५, शिवाजीनगरमधील १२ तर शहापूरमधील १० मंडळांचा समावेश आहे.

इचलकरंजी उपविभागात गावभाग पोलिस ठाण्याच्या हद्दीत १५४, शहापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३३२ तर शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३३५ असे एकूण शहरात ८२१ तर कुरूंदवाड हद्दीत ५१६ आणि हुपरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत २८६ मंडळांनी श्रींची प्रतिष्ठापना केली आहे. यासाठी जल्लोषात मिरवणुका काढल्या होत्या. त्यात साऊंड सिस्टीमचा दणदणाट करणार्या मंडळांवर कारवाईची मोहिम पोलिसांनी हाती घेतली आहे. याची माहिती पोलिस उपअधीक्षक विक्रांत गायकवाड यांनी दिली.

## पर्यावरण जतन आणि संवर्धनासाठी पर्यावरण पूरक बियांचे बाप्पा

**पुणे : हॅलो प्रभात**

न्यू होप सोशल फाउंडेशन व स्त्री सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरण पूरक शाडू माती पासून गणपतीची मूर्ती बनविणे आणि मूर्ती मध्ये बी रोपण करणे असा आगळावेगळा उपक्रम केला असून सी. आर. रंगनाथन कला व वाणिज्य कर्णबधिर कनिष्ट महाविद्यालयम ध्ये घेण्यात आला.भारतीय सण, उत्सव व परंपरेला पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने ही महत्व आहे. यामाध्यमातून पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे हा ही संदेश दिला जातो. मूर्ती कुंडीत विसर्जन करून त्यामध्ये पेरले ले बी यांचे झाड आल्यावर जतन केले पाहिजे



एकांदर, झाडे लावा झाडें जगवा असा सामाजिक संदेश देण्यात आला.

कार्यक्रमचे आयोजन न्यू होप फॉउंडेशन अध्यक्षा माया ओव्हाळ व स्त्री सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा गीतांजली हेंदे सारगे यांनी केले

या उपक्रमात संयुक्त विद्यामन स्वयंसेवक,स्नेहा तुपरे,ज्ञानेश्वरी गुंड , अलिशा शेख,माधुरी गाडेकर,आरती भाटनगर ,संतोषी गारवे, सोनल काटरपवार व इतर सभासद उपस्थित होते. मुलांनी उत्साहात सहभाग घेऊन आनंद लुटला.

## उद्योजक मेळाव्यासाठी नोंदणी करा : जिल्हाधिकारी काकडे

**सांगली : हॅलो प्रभात**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सांगली व दे आसरा फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १० ते १ या वेळेमध्ये उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा वसंतदादा पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, सांगली-मिरज रोड, सांगली यांचे स्व. डॉ. ए. डी. शिंदे सांस्कृतिक सभागृह येथे होणार आहे. जिल्ह्यातील सर्व उद्योजकांना मार्गदर्शन लाभावे व उद्योजक तरुण-तरुणींना व्यवसायाची प्रेरणा मिळावी यासाठी हा मेळावा घेण्यात येत आहे. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी इच्छुक उद्योजकांनी https://forms.gle या गुगल फॉर्ममध्ये नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

विविध क्षेत्रांतील सूक्ष्म, लघु व नवउद्योजक एकत्र आणून ज्ञानाची देवाणघेवाण करणे, नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करुन देणे तसेच व्यवसाय वाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यासाठी आणि नवीन उद्योजक घडावेत व जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेस चालना मिळावी यासाठी उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

---

## आरआयटीच्या समृद्धीची मिनी ऑलिंपिकसाठी निवड



**इस्लामपुर : हॅलो प्रभात**


राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर येथील विद्यार्थिनी समृद्धी चंद्रशेखर पाटील हि सिव्हील विभागात द्वितीय वर्षात शिकत असून हिने इंडिया तायक्वांदो असोसिएशन महाराष्ट्र तर्फे नाशिक येथे आयोजित केलेल्या तायक्वांदो स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ४६ ते ४९ किलो वजनी गटामध्ये प्रभावी कामगिरी करून तिने ब्राँझ मेडल पटकावले.

या यशामुळे तिची निवड आता इंडिया तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मार्फत आयोजित मिनी ऑलिंपिक स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

तिच्या या उत्तुंग यशाबद्दल महाविद्यालयातर्फे तिचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. पी. व्ही. कडोले, डीन स्टुडंट डेव्हलपमेंट डॉ. एल. एम. जुगुलकर, जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संग्रामसिंह पाटील तसेच सिव्हील विभाग प्रमुख डॉ.पी.डी.कुंभार उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या वतीने समृद्धीचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या.

## विराज ग्रुप ऑफ इंडस्ट्रीमध्ये गणरायाचे उत्साहात आगमन



**शिराळा : हॅलो प्रभात**

कापरी(ता. शिराळा) येथील विराज ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लि. येथे श्री गणेश चतुर्थी निमित्त गणरायाचे मोठया उत्साहात आगमन झाले. यावेळी फटाक्यांचीआतषबाजी करण्यात आली. इंडस्ट्रीजमधील मुख्य कार्यालयासमोरचे परिसरामध्ये सजावट करणेत आली. इंडस्ट्रीजचे चेअरमन व कार्यकारी संचालक विराज नाईक व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. शिमोनी नाईक या उभयतांचे हस्ते विधिवत पूजन करून श्रींची प्राणप्रतिष्ठापना व आरती करण्यात आली. यावेळी इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर युवराज गायकवाड सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये हणमंतनगर प्रशालेचे यश

**देवराष्ट्रे : हॅलो प्रभात**

कडेगाव तालुक्यातील चिंचणी (अं.) हणमंतनगर जिल्हा परिषद प्राथमिक डिजिटल सेमी इंग्रजी शाळा येथील विद्यार्थ्यांनी केंद्रस्तरीय विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.



चिंचणी केंद्रस्तरीय स्पर्धेत अभिवाचन स्पर्धेमध्ये कृतिका होनमाने हिने प्रथम क्रमांक मिळवला व तालुकास्तरासाठी निवड झाली.कथाकथन स्पर्धेमध्ये शौर्य महाडिक उत्तेजनार्थ,वक्तृत्व स्पर्धेमध्ये सुरक्षा खाडे द्वितीय क्रमांक, आराध्या जाधव, उत्तेजनार्थ, कृतिका होनमाने उत्तेजनार्थ, गायन स्पर्धेमध्ये ज्ञानदा कदम, तृतीय क्रमांक, सक्षम पाटील.

बहुमोल कामगिरी करून शाळेचा चिंचणी केंद्रामध्ये लौकिक वाढविला. यावेळी विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापक माया कुंभार, कृतियुक्त उपक्रमशील शिक्षक रामलिंग खाडे यांचे मार्गदर्शन तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णत जाधव, उपाध्यक्ष शामबाला महाडीक व पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले.

या उज्वल कामगिरीबद्दल संपूर्ण गावातून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील प्रगतीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## आरआयएमसी प्रवेशपात्रता परीक्षा निकाल जाहीर

**सांगली : हॅलो प्रभात**

राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज (RIMC) डेहराडून (उत्तराखंड) प्रवेशपात्रता परीक्षा (राज्यस्तरावर) दि. १ जून २०२५ रोजी घेण्यात आली. या लेखी परीक्षेचा निकाल दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी जाहीर केलेला आहे. या परीक्षेसाठी महाराष्ट्रातून प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचा निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या https://www.mscepune.in/ या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.



---

## नृसिंहवाडीत 'ऋषिपंचमी' व्रत उद्यापन

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

कृष्ण पंचगंगेच्या काठावर असलेल्या तीर्थक्षेत्र नृसिंहवाडी येथे ऋषिपंचमी निमित्त अनेक महिला भगिनींनी ऋषिपंचमी व्रत उद्यापन करून मनोभावे पूजन केले. गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी येणाऱ्या ऋषिपंचमी या सणाला फार मोठे महत्त्व आहे तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जाऊन ऋषिपंचमी व्रत उद्यापन करण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. गुरुवारी सकाळपासूनच महिला मोठ्या प्रमाणात कृष्णेत पवित्र स्नान करून दत्त महाराजांचे दर्शन घेऊन ऋषिपंचमी पूजन केले. यावेळी ब्रह्मवृंदांकडून त्याचे कथा सांगण्यात आली याचे श्रवण मोठ्या भक्ती भावाने व्रत उद्यापन करणाऱ्या महिलांनी केले. या पूजनाचे पौराहित्य वेदमूर्ती विवेक ढोबळे, रवींद्र ढोबळे, श्रीपाद पुजारी उदय शिर्टीकर, उत्तम फौजदार आदींनी केले.

मंदिराच्या वरील बाजू स यासाठी पूजेची खास व्यवस्था करण्यात आली होती. पांढरी वस्त्रे परिधान करून महिलांनी ऋषिपंचमी व्रताचे मनोभावे पूजन केले. पूजनासाठी कृष्णेच्या जलाचा वापर करण्यात आला. पुराण कथेचे वाचन करण्यात आले. या व्रता निमित्त महिलांनी दिवसभर उपवास केला होता. ऋषिपंचमी साठी लागणाऱ्या विनायंत्र विना पशु यापासून पिकवण्यात आलेल्या भाज्या,अन्नधान्य याची विशेष खरेदी महिलांकडून करण्यात आली होती. मोठ्या भक्ती भावांनी या व्रताचे शेकडो महिलांनी येथे येऊन उद्यापन. केले.

## राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून प्रवेशासाठी

**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय भारतीय सैन्य म हाविद्यालय, डेहराडून (उत्तराखंड) येथे फक्त इयत्ता ८ वी साठीची प्रवेशपात्रता परीक्षा दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी मुले व मुली प्रविष्ट होऊ शकतात. या परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर करण्याची मुदत दि. १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत असल्याचे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

या परीक्षेसाठी विद्यार्थी / विद्यार्थीनीचे वयोमर्यादा (वय) दिनांक १ जुलै २०२६ रोजी ११ वर्षे ६ महिने पेक्षा कमी आणि १३ वर्षापेक्षा अधिक नसावे. म्हणजेच विद्यार्थी / विद्यार्थिनीचा जन्म दिनांक २ जुलै २०१३ च्या आधीचा व दिनांक १ जानेवारी २०१५ च्या नंतरचा नसावा.

आवेदनपत्र ऑफलाईन किंवा ऑनलाईन पध्दतीने पैसे भरून मागवू शकतो. परीक्षेचे माहितीपत्रक व जुन्या प्रश्नपत्रिकांचे संच राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेअराडून यांच्याकडून मागविण्याकरिता राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज डेहराडून यांच्या॒.ीळाल.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सर्वसाधारण व इतर संवर्गाकरिता ६०० रूपये व अनुसूचित जाती / जमाजी करिता ५५५/- रूपये भरून आवेदनपत्राची मागणी करता येईल. आवेदनपत्र परिपूर्णपणे भरून सोबत आवश्यक कागदपत्रे जोडून मा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ) भांबुर्डा, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट सेंटरच्या मागे, शिवाजीनगर, पुणे-४११००४ या पत्त्यावर दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने स्पीड पोस्टाने पाठवावीत किंवा समक्ष येऊन जमा करावीत. कुठल्याही परिस्थितीत आवेदनपत्र RIMC कडे जमा करू नयेत.अधिक माहितीसाठी ०२०-२९७०९६१७ या दूरध्वनीवर, email : msce-pune.in किंवा www.msce-pune.in या वेबसाईटला भेट द्यावी, असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

## शिवाजीराव देशमुख यांना शिराळा तालुक्यात अभिवादन

**शिराळा : हॅलो प्रभात**

शिराळा तालुक्यातील कोकरूड आरळा चरण शिराळा सागाव मांगले गावात त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले यानिमित्त अनेक उपक्रम राबविण्यात आले.

कोकरूड ता.शिराळा येथे डोंगरी विभागाचे शिल्पकार माजी विधान परिषद सभापती, स्व. शिवाजीराव देशमुख यांच्या अर्धकृती पुतळ्याचे अनावरण समारंभ गोरक्षनाथ मठाचे मठाधिपती पीर पारसनाथ महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आ. सत्यजित देशमुख , फत्तेसिंगराव देशमुख, संपतराव देशमुख, रेणुकादेवी देशमुख, हनुमंतराव पाटील, केदार नलवडे, संचालक प्रा प्रदीप शेटे आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. देशमुख म्हणाले, स्व. शिवाजीराव देशमुख यांनी सर्वसामान्य माणसांच्या हितासाठी कायम काम केले. लोकहिताचे निर्णय घेत गोरगरिबांना आधार दिला

यावेळी विकास नांगरे, विकास देशमुख, विश्वप्रताप नाईक, गोविंद माने, बाजीराव शेडगे, अनिल देशमुख, सुजित देशमुख, कीर्ती पाटील, आनंदराव पाटील, अंकुश नांगरे, मोहन पाटील, सुदाम पाटील, सुनील पाटील आदी उपस्थित होते.



# कोपरगावमध्ये रंगणार वाजवेल तो गाजवेल 'ढोल ताशा स्पर्धा'

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

दरवर्षीप्रमाणे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संजीवनी युवा प्रतिष्ठानतर्फे कोपरगाव तालुक्यातील युवकांसाठी भव्य वाजवेल तो गाजवेल ढोल ताशा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा येत्या २ सप्टेंबर २०२५ रोजी तहसील मैदान, कोपरगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.यासाठी भरघोस बक्षिसांचे आयोजन देखील करण्यात आले आहे असे युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे.कोपरगाव तालुक्यापुरती मर्यादित असलेली ही स्पर्धा दरवर्षी अत्यंत दिमाखात आयोजित केली जाते.

विविध ढोल-ताशा पथकांना एकत्र येऊन कौशल्य दाखविण्याची, तालबद्धतेने सजून गाजविण्याची ही संधी

## संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित ढोल ताशा स्पर्धा

असते. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक पथकात किमान १५ सदस्य असणे अनिवार्य आहे. तसेच वेशभूषा, नियम व अटी यासंबंधीची सविस्तर माहिती संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी प्रतिष्ठानचा ८१८१९०९०९० हेल्पलाइन क्रमांकही कार्यान्वित करण्यात आला आहे.गणेशोत्सव हा आनंद, एकोपा आणि परंपरेचा सण असून त्यात ढोल-ताश्यांचा गजर वातावरणात उर्जा आणि उत्साह निर्माण करतो. या माध्यमातून केवळ कलागुणांना वाव मिळत नाही तर तालुक्यातील युवा कलाकारांना स्वतःची कला सादर करण्यासाठी योग्य व्यासपीठही मिळते. प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी आयोजित होणाऱ्या या उपक्रमाची संकल्पना युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांची आहे. त्यांनी युवकांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने अशा उपक्रमांची परंपरा निर्माण केली आहे. संजीवनी युवा प्रतिष्ठानचे हे आगळेवेगळे उपक्रम सामाजिक बांधिलकीसह युवकांना प्रोत्साहन देणारे ठरत असून कोपरगाव तालुक्यातील ढोल-ताशा पथकांसाठी वाजवेल तो गाजवेल ही स्पर्धा एक वेगळा उत्साह व प्रेरणा निर्माण करणार आहे.अधिकाधिक पथकांनी यात आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन देखील करण्यात आले आहे. ढोल ताशाच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वादनाचा आनंद घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असेही सांगण्यात आले आहे.

## प्रेषितांनी मानवजातीला सेवाभावाचा संदेश दिला : एजाज तांबोली



**राहुरी : हॅलो प्रभात**

इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद मुस्तफा (स.) पैगंबर यांनी मानवजातीला दिलेला संदेश म्हणजे दया, करुणा, समानता आणि सेवाभावाचा संदेश दिला.त्यास अनुसरून समाजासाठी रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन केल्याची माहिती एजाज तांबोली यांनी दिली.आपला रक्तगट माहिती असेल तर आपत्कालीन परिस्थितीत आपण त्वरित मदत करू शकतो. अल करम हॉस्पिटलच्या वतीने हजरत मुहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त नगर शहरातील सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. याप्रसंगी मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, संस्थेचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. अब्दुस सलाम सर,फरीदा भाभी, गौसिया तांबोळी, अल करम हॉस्पिटलचे एजाज तांबोली, मुख्याध्यापक सय्यद नौशाद, शिक्षक शेख फरजाना दिलावर, शेख अस्लम पटेल, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उज़मा , शेख यास्मीन व शेख सुलताना आदी उपस्थित होते.

## कोट्यवधींची सुगंधी तंबाखूसह सुपारी जप्त



### स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी हद्दीत मोठी कारवाई

**राहुरी : हॅलो प्रभात**

अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी हद्दीत नगर-मनमाड महामार्गावर एक मोठी कारवाई करत कोट्यवधी रुपयांचा सुगंधी तंबाखू आणि सुगंधी सुपारीचा साठा जप्त केला .

या कारवाईत एक ट्रक तंबाखू आणि १२ ट्रक सुगंधी सुपारी असा एकूण १३ ट्रक माल पकडला.मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व ट्रक बेंगळूरू येथून अहमदाबादकडे जात होते. कोल्हार खुर्द येथे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. इतक्या मोठ्या प्रमाणावर सुगंधी सुपारी आणि तंबाखू जप्त करण्याची ही जिल्ह्यातील पहिलीच घटना असावी.

ही यशस्वी कारवाई अहिल्या नगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, सहायक फौजदार रमेश गांगुर्डे, हवलदार राहुल द्वारके, पोलीस नाईक रिचर्ड गायकवाड, भीम राज खरसे, पोलीस कॉन्स्टेबल सुनील माळणकर, राहुल डोके, पोलीस हवालदार गणेश लबडे, सतीश भवर, संतोष खैरे, आणि अमृत आढाव यांनी केली.

# बाधित शेतकऱ्यांना सरसकट भरपाई द्या : राजू शेट्टी

## शिष्टमंडळासह घेतली कृषिमंत्री भरणे यांची भेट

**इंदापूर : हॅलो प्रभात**

राज्यातील पूरग्रस्त अतिवृष्टी ग्रस्त भागातील नुकसानीची सरसकट भरपाई द्या, असे निवेदन स्वाभिमानी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी शिष्ट मंडळासह गुरुवारी (दि. २८) इंदापूर तालुक्यातील भरणेवाडी येथे कृषिमंत्री भरणे यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिले. राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राजू शेट्टी यांनी कृषिमंत्री भरणे यांच्यासोबत चर्चा केली.

महापूर व अतिवृष्टीने शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक भागामध्ये



जमीनी खरडून गेल्या असून पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. राज्यातील अनेक भागाम ध्ये एका दिवसात जवळपास ३०० मिलीमीटर इतक्या विक्रमी पावसाची नोंद झाली आहे. विशेषता राज्यातील सर्वाधिक नांदेड , धाराशिव , हिंगोली , बुलढाणा जिल्ह्यासह मराठवाडा , विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांना फटका बसला आहे. वरील जिल्ह्यातील कापूस , सोयाबीन , उडीद , मका , मूग , फळबागा या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्यातील पुरगस्त व अतिवृष्टी भागातील नुकसान झालेल्या शेतक-यांना सरसकट नुकसान भरपाईची मदत जाहीर करावी असे माजी खासदार राजू शेट्टी यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी सतिश भैय्या काकडे ,पृथ्वीराज जाचक, अमरसिंह कदम, राजेंद्र ढवाण पाटील , अजित बोरकर , धनंजय महामुलकर, नितीन यादव यांचेसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी ऊपस्थित होते.

# गोकुळ दूध संघाची उत्पादकांना गणेशोत्सवी भेट

## दुधाच्या दरात १ रुपयांची वाढ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



गोकुळ दूध संघाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दूध उत्पादकांसाठी मोठा दिलासा जाहीर केला आहे. म्हैस व गाय दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपयांची वाढ करण्यात आली असून १ सप्टेंबरपासून हे दर लागू होणार आहेत. याशिवाय संस्था इमारत अनुदानात वाढ, दूध संस्था कर्मचारी प्रोत्साहन दरात ५ पैशांची वाढ तसेच मुक्त गोठा योजनेचा लाभ आता ४ जनावरांच्या गोठ्यांनाही मिळणार आहे. या निर्णयांमुळे दूध उत्पादक, संस्था व कर्मचारी वर्गाला मोठा फायदा होणार असून, गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ म्हणाले की, दूध उत्पादकांच्या श्रमाला योग्य न्याय मिळवून देणे हेच गोकुळचे ध्येय आहे.

## हिमालय वेलनेसचा 'वर्ल्ड ऑफ नीम' उपक्रम

**मुंबई : हॅलो प्रभात**

गेली २५ वर्षे हिमालय वेलनेसने कोट्यवधी भारतीय तरुणांचा पिंपल्स आणि एक्ने विरुद्ध लढ्यात नीमच्या शक्तीद्वारे विश्वासू सोबती म्हणून प्रवास केला आहे. या परंपरेला पुढे नेत ब्रँडने 'वर्ल्ड ऑफ नीम' हा पहिला भव्य उपक्रम ताज लॅण्ड्स एंड येथे पिंपल एक्ने पॉझिटिव्हिटी डे च्या पूर्वसंध्येला आयोजित केला, ज्यामध्ये त्वचेच्या निगेबद्दल आणि आत्मविश्वासाबद्दल एक महत्त्वपूर्ण संवाद सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारतातील जवळपास ८ पैकी ४ तरुणांनी मान्य केले आहे की पिंपल्स आणि एक्ने मुळे त्यांचा सामाजिक ठिकाणी आत्मविश्वास कमी होतो. देशात सुमारे २० कोटी किशोरवयीन आणि तरुण प्रौढ या समस्येशी झुंज देत आहेत.

त्यामुळेच पिंपल एक्ने पॉझिटिव्हिटी डे हा कलंक मोडून काढण्याबद्दल, आत्मविश्वास वाढवण्याबद्दल आणि पिंपल्स व एक्नेवरील सोप्या व प्रभावी उपायांविषयी जनजागृती करण्याबद्दल आहे. 'वर्ल्ड ऑफ नीम' हा उपक्रम आजच्या तरुणांच्या मनाशी जुळणारा ठरावा, यासाठी डिझाइन करण्यात आला होता. या कार्यक्रमात त्वचेची निगा कशी साधी, प्रभावी आणि सर्वंकष असू शकते,

# श्री शिवाजी हायस्कूल मध्ये 'मोफत सायकल' सोहळा संपन्न

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

येथील श्री शिवाजी हायस्कूल,चिंचणी (अं.) मध्ये मोफत १० सायकलींचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दि. २६ ऑगस्ट रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शिकत असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या गरीब, होतकरू, हुशार आणि ३ ते ५ किलोमीटर पेक्षा जास्त लांब अंतरावरून शाळेत पायी -पायी चालत येणाऱ्या गरजाधिष्ठित दहा विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे सचिव प्रकाश लाड यांचे सहकारी मा. दिलीप शेटे साहेब मुंबई हे सामाजिक बांधिलकी! या नात्याने व एक हाथ शैक्षणिक प्रगतीसाठी ही इच्छा उराशी बाळगून त्यांचे सहकारी डॉ. घारसे, शकुंतला बर्वे, साधना म्हात्रे, आसावरी जोशी, वसुधा ठाकुर , श्वेता



नाईक, प्रगती नाईक, संजय लोटलीकर , विनोद नायक , माधुरी भगवते, निलिमा कोडोलीकर, विवेक भिडे, मिहिर गांधी, डॉ. पिंगे, ड. पंडित कासार, अनुप कामत खडपे, कल्पना साठे, जान्हवी लिमये, डॉ. तळवळकर, अंकिता मोदी, चित्रा करंडे, आर एम सुर्वे, ड संदीप आवळे, श्रीमती मच्छिंद्र,आशिष कुलकर्णी, स्क्रुवाला , गौरी कर्वे, पूजा नायर, श्रीमती शुभदा पवार, चंद्रशेखर साळवी इत्यादी देणगीदारांच्या मदतीने गांधी एज्युकेशन सोसायटीच्या विविध शाखा मधील विद्यार्थ्यांना दर वर्षी सायकल वाटप करतात. एकूण दहा सायकलींचे वाटप, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप पाटील व शाळेचे मुख्याध्यापक अरुण सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सायकल वाटप नियोजन विजय काकडे यांनी पाहिले, कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचलन राहुल कुंभार यांनी केले .या प्रसंगी ज्येष्ट शिक्षक उमाकांत सावत, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, सायकल प्राप्त विद्यार्थ्यांचे पालक, सर्व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी आदरणीय शेटे साहेब व त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे मनःपूर्वक आभार सायकल प्राप्त पालकांनी व्यक्त केले.

## गृहनिर्माण क्षेत्रासाठी सणासुदीचा काळ ठरतोय वरदान

**मुंबई : हॅलो प्रभात**

गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंतचा सणासुदीचा कालावधी भारतातील गृहनिर्माण बाजारातील मागणीस नेहमीच चालना देतो आणि वार्षिक विक्रीत जवळपास एकतृतीयांश वाटा उचलतो. २०२५ ची पहिली सहामाही तुलनेने स्थिर राहिली असली, तरी सणासुदीच्या हंगामात बाजारपेठेत नव्या उत्साहाची लाट आहे. विकासक एकापाठोपाठ महत्त्वाचे प्रकल्प लॉन्च करत असून आकर्षक ऑफर्स सादर करत आहेत, तर खरेदीदारही आपल्या निर्णयाला पुढे नेण्यासाठी उत्सुक आहेत. मध्यम व प्रीमियम सेगमेंटमधील सातत्यपूर्ण मागणी, ग्राहकांच्या आत्मविश्वासात झालेली लक्षणीय वाढ आणि जीवनशैलीवर आधारित निवास प्रकल्पांकडे वाढलेले आकर्षण अशा सकारात्मक घटकांचा संगम हे सणासुदीचा मोसम वरदान ठरण्याचे प्रमुख कारण आहे

# वाढत्या चोऱ्या रोखण्यासाठी पोलीस गस्त वाढवावी




### वाढत्या चोरांच्या घटनांमुळे ग्रामस्थ झाले सतर्क

**दौंड : हॅलो प्रभात**

बोरीऐंदी ( ता. दौंड ) गावात मागील काही दिवसात झालेल्या चोरीच्या घटना लक्ष्यात घेता पोलीस गस्त वाढवावी अशी मागणी बोरीऐंदी ग्रामपंचायतने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. आपल्या पत्रकार ग्रामपंचायतने म्हटले आहे की, बोरीऐंदी गाव व गाव परिसरात मागील काही दिवसात मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटना घडल्या आहेत. अनेक भागात ग्रामपंचायतच्या कृपेने स्ट्रीट लाईट, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच खांबावरील बल्ब बसवण्याचे काम चालू आहे. काही ठिकाणी काम पूर्ण झाले असून वाड्या वस्त्या वरील खांबावरील बल्ब व स्ट्रीट लाईट बसवण्याचे काम चालू आहे. बोरीऐंदी परिसरात सध्या चोरट्यांचा धुमाकूळ सुरू आहे. त्यामुळे हवालदिल झालेल्या नागरिकांनीच अखेर आता रात्री डोळ्यात तेल घालून गावाचं रक्षण करायचं ठरवलं आहे. मात्र, तरीही नागरिकांच्या मदतीसाठी पोलिस विभागाने रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी या प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली असल्याची माहिती सरपंच प्रज्ञा गायकवाड यांनी दिली.

# 'सदावर्ते' मराठा समाज तुमचं अस्तित्व मातीमोल करेल : प्रशांत जाधव

## गुणरत्न सदावर्ते यांच्यावर जोरदार हल्लाबोल

**मुंबई: हॅलो प्रभात**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर, शिवसेना (उबाठा) गट नेते आणि शिवछत्रपती ग्रुपचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी ड. गुणरत्न



सदावर्ते यांच्यावर जोरदार टीका केली आहे. सदावर्ते मराठा समाजाला सातत्याने लक्ष्य करत असल्याचा आरोप करत जाधव यांनी त्यांना कठोर शब्दांत इशारा दिला आहे.

नव्या पनवेल उपविभाग प्रमुख असलेल्या जाधव यांनी सदावर्ते यांना उद्देशून म्हटले आहे, तुमचे कामच समाज फोडणे आणि मराठ्यांच्या हक्कावर कुरघोडी करणे आहे. मराठा समाज शांत आहे,

याला कमजोरी समजू नये, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. आमच्या आरक्षणावर तोंड चालवले, तर जीभ ओढून काढू,असेही ते म्हणाले.

याशिवाय, समाजाची थट्टा केली तर थोबाड फोडून रस्त्यावर ओढत नेऊ,अशा धमक्याही जाधव यांनी दिल्या. श्री.जाधव पुढे म्हणाले, मराठा आरक्षणाची मागणी हा हक्क आहे, उपकार नाही असे ठामपणे सांगितले. या हक्कासाठी लढताना मराठा समाजाची ताकद काय असते, हे महाराष्ट्राने वेळोवेळी पाहिले आहे, असेही त्यांनी नमूद केले. आपल्या निवेदनात जाधव यांनी सदावर्ते यांना थेट आव्हान दिले आहे.

अजून भुंकलात तर मराठा समाजाचा राग तुमचं अस्तित्व मातीमोल करेल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

## सुशिला पाटील यांचे निधन



**तासगाव : हॅलो प्रभात**

निमणी (ता. तासगाव) येथील श्रीमती सुशिला आप्पासाहेब पाटील वय ९३ यांचे दुःखद निधन झाले. स्व.स्वातंत्र सेनानी तात्यासाहेब पाटील यांच्या त्या वहिनी व स्वातंत्र्य सैनिक आप्पासाहेब पाटील यांच्या पत्नी होत्या. तासगांवचे तहसीलदार अतुल पाटोळे व गटविकास अधिकारी अविनाश पाटील यांनी पार्थिव देहाचे अंतिम दर्शन घेऊन शासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण केले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## किणी टोल नाक्यावर 'उबाठा'चे आंदोलन ; काही तास टोलमुक्त वाहने



**वारणानगर : हॅलो प्रभात**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या टोल वसुली बाबतच्या निर्णयाचा शासनाने आदर राखावा, कागल ते सातारापर्यंतचा रस्ता पूर्ण झाल्याशिवाय टोल वसुली करू नये, संपूर्ण रस्ते खड्डे मुक्त करावेत या मागणीसाठी आज उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या वतीने किणी (ता. हातकणंगले) टोल नाक्यावर घोषणा देत वाहने मोफत सोडत आंदोलन केले. यावेळी टोल प्रशासनाला निवेदन देण्यात आले.उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख रविकिरण इंगवले यांच्या नेतृत्वाखाली किणी नाक्यावर शिवसैनिक आले. यावेळी टोल प्रशासनाने टोल वसूल करु नये अशी घोषणा देत शिवसैनिकानी अर्ध्या तासाहून अधिक वेळ वाहनांना टोलमुक्त केले. यावेळी परीसर घोषणांनी दणाणून निघाला. यानंतर टोल प्रशासनास निवेदन दिले. यावेळी हाजी असलम सय्यद, हर्षल पाटील, राकेश पाटील, अनिल दबडे, संजय लोहार, नारायण कुंभार, प्रवीण माळी, अमित घोटवडेकर, पंडित पाटील, जनार्दन माने, मोशीन पोवाळे, जावेद कुरणे, सोहेल पटाईत, ऋषिकेश दबडे, बंडा लोंढे, जितेंद्र कुबडे, संजय काळुगडे,विनोद रोहिडा, यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

# कोल्हेंवर विश्वास दाखवत काळे गटाला मोठे खिंडार

## तळेगाव मळेमध्ये अनेकांची काळे गटाला सोडचिठ्ठी

**कोपरगांव : विनोद जवरे**

कोपरगाव तालुक्यातील तळेगाव मळे येथील काळे गटातील असंख्य कार्यकर्त्यांनी सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. आमदार काळे यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीला कंटाळून कोल्हे कुटुंबावर विश्वास दाखवत प्रवेश झाले आहे.यामध्ये मनोज काजळे, रामेश्वर काजळे, संजय टुपके, विष्णू शिंदे, कैलास टुपके, सुरेश जाधव, सोन्याबापू टुपके, दादासाहेब शेटे, ज्ञानदेव टुपके, रामनाथ साबळे, बंटी आभाळे, विलास शिंदे, रमेश गांगुर्डे, प्रकाश टुपके, रमेश टुपके, संजय टुपके, खुशालचंद आभाळे, शिवाजी जाधव आदीसह अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश झाला आहे. विवेकभैय्या कोल्हे यांनी सर्वांचे भारतीय जनता पार्टीमध्ये हार्दिक स्वागत केले आणि मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. आशुतोष काळे यांच्याकडून अपेक्षित कामे होत नाही.केवळ सत्तेवर येण्यापर्यंतच आश्वासनांची खैरात झाली मात्र प्रत्यक्षात शेती आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न बिकट होण्याला कारभारात नसलेलेली सुसूत्रता जबाबदार आहे.ग्रामीण भागातील जनतेचे दैनंदिन कामे होण्यास अडचण असून अधिकाऱ्यांवर वचक लोकप्रतिनिधीचा नाही.भरमसाट टक्केवारी आणि निकृष्ट कामे यामुळे नागरिक त्रस्त आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत या कारभाराला जनमताने उत्तर देऊ असा विश्वास सर्वांनी यावेळी व्यक्त केला.याप्रसंगी कोल्हे कारखाना संचालक त्र्यंबकराव सरोदे, नारायणराव टुपके, दादा अप्पा टुपके, तुकाराम जाधव, वाल्मिकराव पिंपळे, साई संजीवनी बँकेचे संचालक सुरेश जाधव,वसंतराव कदम, धोत्रे सरपंच प्रदीप चव्हाण, किरण चव्हाण, भाऊसाहेब गागरे, मंजाहरी वैद्य, भाजपा पूर्व मंडल अध्यक्ष विशाल गोर्डे, युवा मोर्चा अध्यक्ष सतीश देवकर, गोरख पाटील, सरपंच दत्तात्रय टुपके, युवा मोर्चा शहराध्यक्ष सिद्धार्थ साठे, बाळासाहेब टुपके, ज्ञानदेव टुपके, आदी मान्यवर उपस्थित होते.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



**सुवर्णसंधी**



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै. हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976